## ঃ दत्ताचा पाळणा ঃ

जो जो जो जो रे जो जो । तूं मी ऐसें उमजो ॥ धृ ॥

प्रेम पालख दत्तात्रया । हालविते अनसूया ।
बोधूनि निजरूप समजाया । भवभ्रमही उडवाया ॥ जो ॥

रजोगुणी तूं ब्रह्य । श्रमलासी तान्हया ।
सुखें निज आतां सखया । धरि रे स्वरूपी लया ॥ जो ॥

तमोरूपें तूं सदाशिवा । विश्रांति घें देवा ।
धरि रे स्वरूपीं तूं भावा । संहारिता विश्वा ॥ जो ॥

विष्णू सत्विक तूं अहंकार । दैत्यांचा संहार ।
करितां श्रमलासी अपार । आतां समजे सार ॥ जो ॥

ऐसा आनंदे पाळणा । मालो गातसे जांणा ।
सद्‌गुरू कृपेंने आपणा । दत्ता निरंजना ॥ जो ॥